# शिक्षण उपसंचालक कार्यालय- पुणे विभाग

१७,डॉ.आंबेडकर मार्ग,लाल देवळासमोर, पुणे-४११ ००१.

दुरध्वनी क्र.-०२०-२६१२५६९६/२६१२२२१७   ई मेल आय डी क्र. dydpune@gmail.com

वेब साईट- WWW.dydepune .com

---

जा.क्र. शिउसं/प्राथ-२०४ /ज रा कु/मान्यता/पुवि/२०२४/ 7664

दिनांक : 2 6 JUL 2024

प्रति,

अध्यक्ष/ सचिव, अजिंक्यतारा क्रीडा व शैक्षणिक प्रतिष्ठान, शिक्रापूर, पुणे

विषय : महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ पासून इ.१ ली ते इ. १२ वी, सर्व शाखा, राज्यमंडळ संलग्नित मराठी माध्यमाची नविन/दर्जावाढ शाळा सुरु करणेसाठी स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर निर्गमित शासन मान्यतेचे अनुषंगाने करावयाचे कार्यवाहीबाबत.

अजिंक्यतारा क्रीडा व शैक्षणिक प्रतिष्ठान, शिक्रापूर, पुणे संचलित अजिंक्यतारा सेमी इंग्लिश मिडीयम स्कूल,गट नं.२१५,शिक्रापूर, ता.शिरुर जि पुणे

संदर्भ : १.विवेक सपकाळ, कार्यासन अधिकारी, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय मुंबई यांचेकडील आदेश जा.क्र.एसएफएस- १०२३/प्र.क्र ७०२/एसएम-२ दिनांक १९.७.२०२४

२ सचिव, अजिंक्यतारा क्रीडा व शैक्षणिक प्रतिष्ठान, शिक्रापूर, पुणे यांचे पत्र जा क्र २०२४-२५/१३, दिनांक २३.७.२०२४ (आवक क्रमांक १०२३१/२३.७.२०२४)

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत अजिंक्यतारा क्रीडा व शैक्षणिक प्रतिष्ठान, शिक्रापूर, पुणे संचलित अजिंक्यतारा सेमी इंग्लिश मिडीयम स्कूल,गट नं.२१५,शिक्रापूर, ता.शिरुर जि पुणे (प्राथमिक ते उच्च माध्यमिक, इ.१ ली ते इ. १२ वी, सर्व शाखा, मराठी माध्यम, राज्यमंडळ) स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर शाळेचे बांधकाम करण्याकरिता संदर्भीय क्र. १ चे शासन आदेशात अ.क्र. १ ते १२ अटी व शर्तीस अधिन राहून शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ पासून स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर सदर नवीन शाळा सुरु करण्याची मान्यता देण्यांत आलेली आहे.

सदर संदर्भीय क्र. १ चे शासन आदेशातील अ.क्र. १ ते १२ अटी व शर्ती आपल्या संस्थेस/ शाळेस बंधनकारक असून त्यानुसार पुढील आवश्यक ती कार्यवाही महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ आणि महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) नियम २०२० मधील तरतुदीनुसार करण्यांत यावी.

(राजेंद्र अहिरे)
अध्यक्ष, क्षेत्रस्तरीय प्राधिकरण,
तथा शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१

प्रत : माहितीस्तव रवाना
श्री विवेक सपकाळ, कक्ष अधिकारी शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२

प्रत : माहितीस्तव व कार्यवाहीस्तव रवाना
शिक्षणाधिकारी (माध्यमिक/ प्राथमिक) जिल्हा परिषद, पुणे

उपसंचालक मान्यता (सेमी) १ ते १२.